# महाराष्ट्र शासन : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(http://www.maha-socialjustice.gov.in)

## अपंग कल्याण

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ अन्वये ऑगस्ट २००० मध्ये राज्यासाठी स्वतंत्र आयुक्तालयाची निर्मिती .अ) सन २००१ च्या जनगणनेनुसार अपंग व्यक्तींची महाराष्ट्रातील संख्या-

| प्रवर्ग | व्यक्ति |
|---|---|
| अंध | ५८०९३० |
| मूकबधीर | २०५४३३ |
| अस्थिव्यंग | ५६९९५४ |
| मतीमंद | २१३२७४ |
| एकूण | १५६९५८२ |

| शासकीय संस्था | | एकूण | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | शासकीय मुकबधीर विद्यालये | ३ | १५५ |
| २ | शासकीय अंधशाळा | ४ | २०० |
| ३ | शासकीय अपंग बालगृहे | ३ | १८० |
| ४ | शा.बहुउद्देशिय अपंग संमिश्र केंद्रे | ६ | ३१० |
| ५ | शा. पौढ अपंग कार्यशाळा | ४ | २१० |
| ६ | अपंग औद्योगिक प्रशिक्षण संस्था | १ | ०१६ |
| ७ | अपंग पुनर्वसन केंद्र, विरार | १ | - |

अपंगांसाठी रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना नोव्हेंबर २००१ मध्ये करण्यात आली.

**अपंगाचे कल्याणार्थ निधी**

| क्र. | सन | तरतुद निधी (लक्ष) |
|---|---|---|
| १ | २००६-०७ | १०९४३.२८ |
| २ | २००७-०८ | १६८०.३०० |
| ३ | २००८-०९ | १८०५९.०० |
| ४ | २००९-१० | ३०४००.०० |

संपर्क : १) संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी गट (अ) जिल्हा परिषद

## <u>अपंग व्यक्तींचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन</u>

**अपंग नव्हे - अनोखे समर्थ व्यक्तिमत्व त्यांचा सन्मान हाच आमचा अभिमान समान संधी, हक्कांचे संरक्षण संपुर्ण सहभाग**

सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: इडीडी - २००३/ प्र.क्र. ७० / सुधार २ दि. १५ नोव्हेंबर २००३
शासन निर्णय क्रमांक : इडीडी - २००३/ प्र.क्र. ७१ / सुधार २ दि. १५ नोव्हेंबर २००३

**उद्दिष्ट**

समाजातील दृष्टिहीन, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मनोविकलांग व कृष्ठरोगमुक्त अपंग व्यक्तीकडे त्यांच्या अपंगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून त्यांच्यामधील असलेले सुप्त सामर्थ्य विकसित करून त्यांना समाज जीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी, संपूर्ण सहभाग व त्याच्या हक्कांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, तसेच इतर विविध विभागामार्फत कल्याणीकारी योजना राबविण्यात येतात. त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षितेसाठी अपंगांना काही क्षेत्रामध्ये आरक्षण, सवलती, सूट व प्राधान्य देण्यात आलेले आहे. या सर्वांचा उद्देश अपंग व्यक्तींना सक्षम बनवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करणे हा आहे. त्या योजना खालीलप्रमाणे.

**आरोग्य**

मुळातच अपंगत्व येवू नये म्हणून अपंग प्रतिबंधात्मक कार्यक्रम, अपंगव्यक्तींचे सर्वेक्षण, शालेय आरोग्य तपासणी, जनजागृती, माता बाल संगोपन कार्यक्रम, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचा-यांना प्रशिक्षण, वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येतात.

**शिक्षण**

अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती: सामान्य शाळेमध्ये, तसेच अपंगांच्या विशेष अनिवासी शाळेमध्ये इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी इयत्ता १ ली ते ४ थी दरमहा रु ५०/-, इयत्ता ५ वी ते७ वी दरमहा रु. ७५/- इयत्ता ८ वी ते १०वी. दरमहा रु १००/-, तसेच मतिमंदांच्या विशेष अनिवासी शाळेतील अतिमंद विद्यार्थ्यांना दरमहा रु ७५/- या दराने शिष्यवृत्ती देण्यात येते. त्याच बरोबर इयत्ता ९ वी व त्यापुढील विद्यालयीन, महाविद्यालयीन, पदवी, पदविका, वैद्यकीय, अभियांत्रिकी व व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता दरमहा रु ९०/- ते ४२५/- या दराने शिष्यवृत्ती देण्यात येते. शिष्यवृत्तीबरोबरच अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता, अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव भत्ता, तसेच वसतिगृहवासी विद्यार्थ्यांना भत्याची रक्कम देण्यात येते.

**अपंग विद्यार्थ्यांना विशेष शाळामार्फत शिक्षण**
अपंग विद्यार्थी अतितीव्र अपंगत्वामुळे सामान्य मुलांबरोबरच सामान्य शाळेत शिक्षण घेवू शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाने विशेष शिक्षणाची मोफत व्यवस्था केली आहे. शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणा-या अपंगांच्या विशेष शाळेमधून दृष्टीहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग व मनोविकलांगसाठी शिक्षणाची सोय केली आहे. या शाळा निवासी व अनिवासी स्वरूपाच्या असून निवासी शाळेमध्ये निवासी, भोजन व शिक्षणाची विनामूल्य सोय आहे. राज्यात एकूण शासकीय २१ व ७१० नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त अनुदानित व ३८ विना अनुदानित शाळा चालू आहेत. एका शाळेमध्ये ५५००० विद्यार्थी शिक्षण प्रशिक्षण घेत आहेत.

**अपंग विद्यार्थ्यांना एकात्मिक शिक्षण**
सर्वसाधारण शाळेतील सामान्य मुलांबरोबरच दृष्टीहीन, कर्णबधिर व अस्थिविकलांग अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण योजनेंतर्गत या विद्यार्थ्यांना, रिसोर्स टीचर, विद्यार्थ्यांना पुस्तके, लेखन सामग्री, परिवहन भत्ता व सामग्रीकरिता आर्थिक मदत दिली जाते. शिक्षण विभागामार्फत सदर योजना राबविण्यात येत आहे.

**शिक्षणशास्त्र अध्यापक पदविका अभ्यासक्रमासाठी आरक्षण**
अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणशास्त्र अध्यापक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे.

**वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी राखीव जागा**
वैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये अपंग विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण, दंत वैद्यकीय महाविद्यालये, शासकीय व अनुदानित आयुर्वेद महाविद्यालये यामध्ये अपंग विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अनुक्रमे ५,२ व ५ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**वसतिगृहामध्ये अपंग विद्यार्थ्यांना राखीव जागा**

- समाज कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहात ३ टक्के जागा राखीव आहेत.
  **(शासन निर्णय क्रमांक: बीसीएच- १०८६/ ५६१९८/(६५)/ बी.सी. डबल्यू.- ४ दि. १५ जुन १९८६)**
- समाज कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अनुसूचित जाती/ जमाती, विमुक्त व भटक्या जमाती, आर्थिक यामध्ये अपंग विद्यार्थी असल्यास त्यांना प्रवेशासाठी प्राधान्य व एकूण जागांच्या ५ टक्के पर्यंत प्रवेश.
  **समाज कल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग**

**(शासन निर्णय क्रमांक : बीसीएच- १०८२/ ९०३८५/ ३५१/ बी.सी. डबल्यु. - ४ दि. ०३ मार्च १९८६)**

- शालेय शिक्षण विभागामार्फत अस्लेल्या शैक्षणिक संस्थाच्या वसतिगृहामध्ये ३ टक्के आरक्षण.
- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली वसतिगृहामध्ये मंजुरप्रवेश क्षमतेच्या ३ टक्के जागा राखीव आहेत.

**माध्यमिक उच्च माध्यमिक परिक्षांसाठी सवलती**

दृष्टीहीन व कर्णबधिर तसेच अध्यायन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांसाठी वाचक लेखनिक देणे, ३० मिनीट जादा वेळ देणे, घरानजिक परीक्षा केंद्र, लेखी परीक्षेत आकृत्या, नकाशे, आलेख काढण्यापासून शिथिलता, गणित शास्त्र अभ्यासक्रमाऎवजी हस्तकलेसारखे दुय्यम विषय, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी जास्तीत जास्त २० इतके सवलतीचे गुण इ. सवलती आहे.

**बक्षीस योजना**

विभागीय परीक्षा मंडळामार्फत घेण्यास येणा-या इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेमध्ये गुणवत्तेनुसार प्रथम तीन क्रंआंने उत्तीर्ण होणा-या दृष्टीहीन, कर्णबधिर व अस्थिविकलांग स्पास्टिक विद्यार्थ्यांना समारंभ पूर्वक रु१,०००/- रोख पारितोषिक देवून गौरविले जाते.
**(शासन निर्णय क्रमांक: बीसीएच - १०८६/ ५६१९८/(६५)/ बी.सी.डबल्य. - ४ दि. १५ जुन १९८६)**

## विभागांतर्गत संस्था / महामंडळे

**महाराष्ट्र राज्य अपंग व वित्त विकास महामंडळ**

१. लघु उद्योग स्थापनेसाठी योजना (केंद्र पुरस्कृत योजना)
२. सेवा विषयक क्षेत्रातील छोटया धंद्यासाठी कर्ज सहाय्य योजना (केंद्र पुरस्कृत योजना)
३. कृषी उद्योगाकरीता कर्ज सहाय्य योजना (केंद्र पुरस्कृत योजना)
४. मानसिक विकलांग (मनोरूग्ण) सेरेब्रल पाल्सी आणि (ऑटीझम) आत्ममग्न अशा

**अपंगासाठी स्वयंरोजगार योजना**

५. वाहतूक व्यवसायासाठी वाहन खरेदी योजना (केंद्र पुरस्कृत योजना)
६. व्यापार खरेदी / विक्री विषयक योजनांखालील छोटया धंद्यासाठी कर्ज सहाय्य योजना
७. सूक्ष्म वित्त सहाय्य योजना (केंद्र पुरस्कृत योजना)
८. अपंगांसाठी प्रविणता / कौशल्य तथा उद्योजकता विकसित करणेसाठी कर्ज योजना
९. मनोरूग्णांना माता, पिता/पालकांद्वारा संचलित संस्थांना संबंधित मनोरूग्णाच्या लाभासाठी कर्ज योजना

**अपंग व्यक्तींचे मानवाधिकार त्यासाठी महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा२०११ -**
अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे-१

**प्रस्तावना**

**१.१ अपंगत्वाची व्याख्या:**

'अपंगत्व' व 'अपंग व्यक्ती' अथवा अनोख्या समर्थ व्यक्ती (Differently Abled Persons) म्हणजे अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग ) अधिनियम, १९९५ मध्ये नमूद केलेल्या व्याख्येप्रमाणे आणि अपंग व्यक्तीच्या कल्याणार्थ जो कयदा अंमलात आणला जाईल त्याप्रमाणे रहील.

**१.२ अपंग व्यक्तींची लोक्संख्या :**

| **क्र.** | **अपंगत्वाचा प्रकार** | **अपंग व्यक्तींची संख्या** | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | अंध | ३२०४६६ | २६०४६४ | ५८०९३० |
| २ | मुके | ६३८०२ | ४९२४१ | ११३०४३ |
| ३ | बहिरे | ५१७८९ | ४०६०१ | ९२३९० |
| ४ | अस्थिव्यंग | ३७४६७१ | १९५२७४ | ५६९९४५ |
| ५ | मतिमंद | १२३१३९ | ९०१३५ | २१३२७४ |
| | **एकूण** | **९,३३,८६७** | **६,३५,७१५** | **१५,६९,५८२** |

महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या १.०६ टक्के एवढी अपंग व्यक्तींची लोकसंख्या आहे.

**१.३ दृष्टीक्षेप:**

अपंग व्यक्तींमधील व्यंग न पहाता, 'अनोखे सामर्थ्य असलेले व्यक्तिमत्व' असे संबोधून त्यांच्यामध्ये असलेले सामर्थ्य व क्षमता ओळखून त्या विकसित करण्यासाठी अपंगत्वाचे लवकर निदान, त्वरित हस्तक्षेप, व्यवसायिक प्रशिक्षण नोकरी इत्यादी क्षेत्रामध्ये त्यांना संधी देवून, आणि कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून दिल्यास त्यांच्यामध्ये जिद्द, आत्मविश्वास निर्माण होऊन ते समाजाच्या मुख्य प्रवाहात सामान्य व्यक्तींसारखे सन्मानपूर्वक जीवन व्यथीत करतात ही बाब लक्षात घेवून शासनाने पुढील दृष्टीकोन (व्हीजन) ठेवला आहे.

प्रतिष्ठा आणि सन्मान अनोख्या समर्थ व्यक्तींसाठी ...त्यांचे सामर्थ्य, कौशल्य आणि जीवनाकडे पहाण्याचा आश्वासक दृष्टीकोन यांना दाद देत ... त्यांच्या सुप्त सामर्थ्यांचा वापर करुन घेत, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी...

A Life of Dignity and Respect for Differently Abled Perosns To optimise their ability, skill and to enhance their parivipation in the min-stream of the society by utilising that under-tapped asset.

**१.४ अस्तित्वात असलेले कायदे व यंत्रणा:**

अपंग व्यक्तींकरीता खालीलप्रमाणे कायदे व यंत्रणा कार्यरत आहेत.

(एक) अपंग व्यक्ती (समाना संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५.

(दोन) महाराष्ट्र राज्य अपंग (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) नियम २००१.

(तीन) आत्ममग्न, मेंदूचा पक्षाघात, बहुविकलांग व मतिमंद व्यक्तीकरीता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९.

(चार) युनायटेड नेशन्स कन्व्हेंशन फॉर दि राइट्स ऑफ पर्सन्स विथ डिसॅब्लिटीज २००६.

(पाच) अपंग व्यक्ती अधिनियमन १९९५ च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे गठीत करण्यात आलेली राज्य समन्वय समिती.

(सहा) अपंग व्यक्ती अधिनियमन १९९५ च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे गठीत करण्यात आलेली राज्य कार्यकारी समिती.

(सात) आयुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे.

(आठ) महाराष्ट्र राज्य अपंग व वित्त विकास महामंडळ, मुंबई.

(नऊ) जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली अपंग व्यक्ती अधिनियमन १९९५ च्या कायद्यातील तरतूदीची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली जिल्हास्तरीय समिती.

(दहा) अपंग व्यक्ती अधिनियमन १९९५ च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी गठीत करण्यात आलेले वैद्यकीय मंडळ (Medical Board).

(अकरा) राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९ मधील तरतूदीप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली स्थानिकस्तर समिती.

(अधिक वाचा... महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा - २०११)

**<u>अपंग कल्याण आयुक्तालय, म पुणे कार्यालयातील अधिकाऱ्यांचे दूरध्वनी.रा.क्रमांक</u>**

| **नाव** | **पदनाम** | **कार्यालयीन दु. क्र.** | **इंटर कॉम नं.** |
|---|---|---|---|
| श्री. बाजीराव जाधव | आयुकत अपंग कल्याण | ०२० - २६१२२०६१ | २१७ |
| श्री. बी. बी. गवंडी | स्विय सहा. | ०२० - २६१२२०६१ | २२१ |
| श्री. एच. आर. कांबले | उपसंचालक (अपंग क) | ०२० - २६१२६४७१ | २१९ |
| श्री. ऐ. व्हि. वळवी | सहा. संचालक | ०२० - २६१२६४७१ | ------ |